अधू शासकीय कर्मचा-यांना कार्यालयाच्या वेळेमध्ये सवलत देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई
शासन निर्णय क्र.एमआएस/1081/73/18, दिनांक 14 ऑगस्ट 1981

पहा : शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई क्र .एमआएस/1080/2/18, दिनांक 12 फेब्रुवारी 1980

शासन निर्णय – मुंबईतील शासकीय कार्यालयातील अधू शासकीय कर्मचा-यांना सकाळी गर्दीच्या वेळी कार्यालयात हजर होणे पुष्कळदा कठीण होते म्हणून कार्यालयात अर्धा तास उशिरा येण्याची सवलत देण्यात आलेली होती.

2 हीच परिस्थिती सायंकाळी कार्यालय सुटल्यानंतरही दिसून येते याचा विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, दिनांक 12 फेब्रुवारी 1980 च्या निर्णयामध्ये नमूद केलेल्या सर्व अटी पूर्ण करीत असेल तर त्याच्या सोईनुसार कार्यालयात सकाळी अर्धा तास सायंकाळी अर्धा तास कार्यालय लवकर सोडण्याची परवानगी देण्यात यावी. ही सवलत देण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना देण्यात येत आहे.

प्र.वि. कोठे

अवर सचिव,
महाराष्ट्र शासन पुणे

GR-20020919162921000-1500